आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

३० एप्रिल २०२६ - गुरूवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महाराष्ट्र विधानपरिषदेच्या १० जागांसाठी प्रमुख पक्षांचे दहाच उमेदवारी अर्ज दाखल, शिवसेनेकडून नीलम गोऱ्हे आणि बच्चू कडू तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून झिशान सिद्दीकींना संधी

- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार अंबादास दानवे यांना महाविकास आघाडीचा पाठिंबा

- भविष्यातलं पर्शियन आखात अमेरिकेच्या हस्तक्षेपापासून मुक्त असेल, असा इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला मोजताबा खामेनी यांचा विश्वास

- यंदाच्या जनगणनेची प्रक्रिया उद्यापासून राज्यभर सुरू

आणि

- मुंबई शेअर बाजाराच्या सेंसेक्समध्ये ५८३ अंकांची घसरण

**<><><><><>**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीतल्या ९, आणि पोटनिवडणुकीतली एक, अशा दहा जागांसाठी आज प्रमुख पक्षांच्या दहाच उमेदवारांनी अर्ज दाखल केले. त्यामुळं ही निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता आहे.

अर्ज भरण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी शिवसेनेनं नीलम गोऱ्हे आणि बच्चू कडू यांची उमेदवारी जाहीर केली. त्याआधी कडू यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. त्यानंतर दोघांनी विधान भवनात जाऊन अर्ज दाखल केले.

राष्ट्रवादी काँग्रेसनं माजी आमदार झिशान सिद्दीकी यांना विधान परिषदेवर संधी दिली आहे. त्यांनीही आज अर्ज भरला.

शिवसेनेनं अंबादास दानवे यांना उमेदवारी दिल्यानं नाराज झालेल्या काँग्रेसनं उमेदवार देण्याची तयारी केली होती. मात्र शिवसेना नेत्यांनी मनधरणी केल्यावर उमेदवार न देण्याचा निर्णय काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी जाहीर केला

**होल्ड सपकाळ**

भाजपानं उमेदवारी दिलेले माधवी नाईक, सुनील कर्जतकर, संजय भेंडे, विवेक कोल्हे आणि प्रमोद जठार यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थितीत अर्ज भरला. प्रज्ञा सातव यांनीही आज भाजपाकडून पोटनिवडणुकीसाठी अर्ज भरला. याशिवाय द्वैवार्षिक निवडणुकीसाठी ५ अपक्ष उमेदवारांनीही अर्ज दाखल केले आहेत. या सर्व अर्जांची छाननी २ मे रोजी होणार आहे.

**<><><><><>**

श्रीनगर - जम्मू या विस्तारित वंदे भारत एक्सप्रेसला रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी जम्मू तवी रेल्वे स्थानकावर आज हिरवा झेंडा दाखवला. श्रीनगरहून श्री माता वैष्णो देवी कटरा स्थानकापर्यंत जाणारी ही गाडी आता जम्मू तावी स्थानकापर्यंत जाईल. गेल्या बारा वर्षात रेल्वे क्षेत्रात लक्षणीय परिवर्तन झालं आहे, असं अश्विनी वैष्णव यावेळी म्हणाले. जम्मू काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला, तसंच प्रधानमंत्री कार्यालयाचे राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंगही यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

ब्राह्मोस एअरोस्पेसने २०२५-२६ मधे ५ हजार दोनशे कोटी रुपयांहून अधिक महसूल जमा केल्याचं डीआरडीओ अर्थात संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेनं म्हटलं आहे. लखनौ इथला प्रकल्प सुरू झाल्यानंतर एका वर्षाच्या आतच या प्रकल्पातून क्षेपणास्त्रांचं वितरण सुरू झाल्याचं डीआरडीओने समाजमाध्यमावरल्या संदेशाद्वारे सांगितलं. चार हजार कोटींचे दोन निर्यात करार झाल्यामुळे ब्राह्मोस एअरोस्पेस जागतिक पातळीवर आपला ठसा उमटवत असून सशस्त्र दलांची मागणी ब्राह्मोस वेळेत पूर्ण करत आहे, असंही डीआरडीओने नमूद केलं आहे.

**<><><><><>**

बलात्कारामुळे गर्भधारणा झाली तर पीडितेच्या गर्भपातासाठी कोणतीही कालमर्यादा नसावी, असं मत आज सर्वोच्च न्यायालयानं व्यक्त केलं. केंद्र सरकारनं कायद्यात आवश्यक सुधारणा करून बलात्कार पीडितांना २० आठवड्यांनंतरही गर्भपाताची परवानगी देण्याबाबत विचार करावा, असंही न्यायालयानं सांगितलं. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जोयमाल्या बागची यांच्या पीठासमोर १५ वर्षीय पीडितेच्या ३० आठवड्यांच्या

गर्भपाताबाबत सुनावणी झाली. एम्स नं या गर्भपाताला विरोध करणारी याचिका दाखल केली होती.

गर्भपाताला परवानगी नाकारली तर पीडितेला जन्मभर मानसिक आघात सहन करावा लागेल, कायदा हा प्रवाही आणि काळाशी सुसंगत असायला हवा, असंही पीठानं म्हटलं आहे. अंतिम निर्णय हा पीडित मुलगी आणि तिच्या पालकांचाच असेल, असंही न्यायालयानं नमूद केलं.

**<><><><><>**

उद्या बुद्ध पौर्णिमा आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज बुद्ध पौर्णिमेच्या पूर्वसंध्येला देशातल्या नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान बुद्धांनी दिलेला करुणा, अहिंसा, आणि ज्ञानाचा संदेश, संपूर्ण मानवजातीला  सदैव मार्गदर्शन करत राहील, भगवान बुद्धांची शिकवण प्रत्येकाला शांतता, सहिष्णुता आणि परस्पर सलोख्याच्या मार्गावरून चालण्याची प्रेरणा देते, असं राष्ट्रपतींनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

भविष्यातलं पर्शियन आखात अमेरिकेच्या हस्तक्षेपापासून मुक्त असेल, असा विश्वास इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला मोजताबा खामेनी यांनी आज 'पर्शियन गल्फ डे'च्या निमित्तानं व्यक्त केला. बाह्य शक्तींनी आखाती देशांच्या व्यवहारात हस्तक्षेप करू नये, असंही ते म्हणाले. इराणच्या प्रतिकार करण्याच्या धोरणामुळे आणि प्रादेशिक बदलांमुळे एक नवी व्यवस्था आकाराला येत असल्याचंही खामेनी यांनी सांगितलं. विज्ञान, उद्योग, अण्वस्त्र तसंच क्षेपणास्त्र यासारख्या प्रगत तंत्रज्ञान क्षेत्रात इराणनं मिळवलेलं यश हे राष्ट्रीय शक्तीचं प्रतीक असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

यंदाच्या जनगणनेची प्रक्रीया उद्यापासून राज्यभर सुरू होणार आहे. १ ते १५ मे दरम्यान सर्वसामान्य नागरिकांना se.census.gov.in या संकेतस्थळावर घरांची नोंदणी करता येईल, अशी माहिती राज्याच्या मुख्य प्रधान जनगणना अधिकारी निरुपमा डांगे यांनी मुंबईत वार्ताहर परिषदेत दिली.

**<><><><><>**

घरातला कोणताही एक सदस्य सुमारे 15 ते 20 मिनिटांत स्व-गणना प्रक्रिया पूर्ण करून कुटुंबाचा तपशील भरु शकतो आणि नोंदणीकृत मोबाईल नंबर किंवा ई-मेलवर एसई, अर्थात स्व-गणना आयडी मिळवू शकतो.

स्व-गणनेदरम्यान कोणतीही कागदपत्रं अपलोड करण्याची आवश्यकता नाही. जनगणना गणक जेव्हा घरी भेट देतील, तेव्हा स्व-गणना केलेल्या माहितीची पडताळणी, पुष्टीकरण आणि अंतिम सादरीकरणासाठी त्यांना एसई आयडी देणं आवश्यक असेल.

<><><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या सेंसेक्समध्ये ५८३ अंकांची घसरण होऊन तो ७६ हजार ९१४ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीतही १८० अंकांची घसरण झाली आणि तो २३ हजार ९९८ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

महाराष्ट्राचा ६७ वा स्थापना दिन उद्या राज्यभर उत्साहात साजरा होणार आहे. मुख्य शासकीय ध्वजवंदन समारंभ सकाळी आठ वाजता होईल. मुंबईत दादरच्या शिवाजी पार्क मैदानावर राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजवंदन होणार आहे. मुख्य शासकीय समारंभात निमंत्रितांना सहभागी होता यावं, यासाठी सकाळी सव्वा सात ते ९ या वेळेत इतर कोणताही शासकीय किंवा अर्धशासकीय ध्वजवंदन कार्यक्रम होणार नाहीत.

<><><><><>

महाराष्ट्र दिनाचं औचित्य साधून मुंबई उपनगरीय रेल्वे मार्गांवर वातानुकूलित आणि १५ डब्यांच्या गाड्यांच्या फेऱ्या वाढणार आहेत.

पश्चिम रेल्वेवरही १२ नवीन एसी लोकलसेवा सुरू करण्यात येणार आहे.

<><><><><>

झारखंडमध्ये, पश्चिम सिंहभूमजवळ सारंडा जंगलात सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत, 'इस्रायल पुर्ती' हा माओवादी ठार झाला. त्याच्यावर १ लाख रुपयांचं बक्षीस होतं. 'कोब्रा २०९ बटालियनसह सुरक्षा दलांची संयुक्त मोहीम गेल्या दोन दिवसांपासून रुतुगुटू, तुनबेदा आणि बोरोई या भागात सुरु होती. त्यादरम्यान माओवाद्यांनी केलेल्या गोळीबाराला

सुरक्षा दलांनी जोरदार प्रत्युत्तर दिलं. चकमकीनंतर घटनास्थळावरून शस्त्रं आणि इतर संशयास्पद साहित्य जप्त करण्यात आलं.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट मध्ये आज अहमदाबादमध्ये गुजरात टायटन्स आणि रॉयल चैलेंजर्स बेंगळुरू यांच्यात सामना सुरु आहे. गुजरात टायटन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा रॉयल चैलेंजर्स बेंगळुरूच्या ८ व्या षटकात ३ बाद ७९ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//